MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक – दिपक थोरात

## भारत सरकार नोटरी पदी दत्तात्रेय जाधवर

बीड ।प्रतिनिधी

शहरातील प्रसिद्ध वकील दत्तात्रेय सूर्यभान जाधवर यांना नुकतेच भारत सरकारच्या वतीने नोटरी प्रमाणपत्र देण्यात आले आहे. या प्रमाणपत्राच्या आधारे पुढील पाच वर्ष ते नागरिकांची सेवा करणार आहेत.गत दहा वर्षापासून वकिली क्षेत्रात कार्यरत असलेले प्रसिद्ध वकील दत्तात्रेय सूर्यभान जाधवर यांना नुकतेच भारत सरकारच्या वतीने नोटरी प्रमाणपत्र बहाल करण्यात आले आहे. या प्रमाणपत्राचा कालावधी पाच वर्षाचा असून जनतेच्या सेवेसाठी ते कार्यरत राहणार आहेत. दत्तात्रय जाधवर यांना नोटरी प्रमाणपत्र मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत असून मांग गारुडी समाजाचे जिल्हाध्यक्ष गोरख काळे, संपादक उत्तम ओव्हाळ, ड . राख, ड. दादासाहेब तांगडे, ड. प्रभाकर आंधळे, ड.पाशा शेख, विजय शिंदे, ड.धम्मा वाघमारे, ड.रवी वाघमारे, ड. मगर, ड. राजन साळवी, ड.शुभम वाघमारे, संतोष ठोंबरे, ड.राम दहिवळ, मारुती ठोंबरे , ड. सोळंके, ड.नागरगोजे, ड.सांगळे सह आदींनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०२ | अंक –१२१ | गुरूवार दि.१६ जानेवारी २०२५ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -121 | THURSDAY DT.16 JANUARY 2025 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# वाल्मिक कराडच्या अनुपस्थितीत त्याच कार्यालयात धनंजय मुंडेंचा जनता दरबार





परळी : मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मिक कराड याच्यावर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. खंडणी आणि संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मिक कराड याला कोर्टाकडून न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. दरम्यान, यापूर्वी वाल्मिक कराड हा धनंजय मुंडेंसाठी काम करत होता. धनंजय मुंडे यांनी त्यांच्या मतदारसंघाची जबाबदारी वाल्मिक कराड याच्यावर सोपवली होती.

जगमित्र कार्यालयात धनंजय मुंडे यांनी घेतला जनता दरबार..

जगमित्र कार्यालयात आज मंत्री धनंजय मुंडे यांनी जनता दरबार घेतलाय. याच कार्यालयात वाल्मीक कराड हा सुद्धा पूर्ण वेळ मतदारसंघाच्या लोकांचे कामे बघायचा..राज्याचे अन्न पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांच्या परळी विधानसभा मतदारसंघातील बहुतेक कामं वाल्मीक कराड बघायचा.. याच जगमित्र कार्यालयातून वाल्मीक कराड हा मतदारसंघातील काम पाहायचा.. कामासाठी येणारे लोक या कार्यालयात येत असत.. फॉर्मिक कराडला संतोष देशमुख हत्याप्रकरणी आणि खंडणीच्या गुन्ह्यात अटक झाल्यानंतर धनंजय मुंडे हे जगमित्र कार्यालयात बसून लोकांना भेटत आहेत आज त्यांनी जनता दरबार सुद्धा घेतला..एरवी धनंजय मुंडे सुद्धा याच कार्यालयात बसून कामासाठी येणाऱ्या लोकांना भेटत असतात मात्र आज कराडच्या अनुपस्थितीमध्ये धनंजय मुंडे यांनी जनता दरबार घेतला.

जगमित्र कार्यालयामध्ये भेटीसाठी मतदारसंघातून आलेल्या लोकांची गर्दी

धनंजय मुंडे यांनी नेहमीप्रमाणे परळीत आल्यानंतर प्रभु वैद्यनाथांचे विधिवत पूजन करून दर्शन घेतले. त्यानंतर आपल्या जगमित्र कार्यालयामध्ये भेटीसाठी मतदारसंघातून व मतदारसंघाच्या बाहेरून आलेल्या नागरिक, कार्यकर्ते, पदाधिकारी यांच्याशी संवाद साधला. भेटण्यासाठी आलेल्या लोकांची कामे समजून घेतली व ती मार्गी लावण्याबाबत आवश्यक कार्यवाही केली.

मकोका लागलेल्या आणि तुरुंगात असलेल्या वाल्मिक कराडमुळे खरंतर अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडेंची कोंडी झाल्याची चर्चा सुरू झालीय. वाल्मिक कराड हा धनंजय मुंडेंचा जवळचा असल्याचा आरोप आहे...त्यामुळेच मुंडेंनी राजीनामा द्यावा अशी मागणी, भाजपचे आमदार सुरेश धस, मनोज जरांगे यांच्यासह विरोधकांनी लावून धरलीय. आता वाल्मिक कराडला मकोका लागल्यानं धनंजय मुंडेंची अजून कोंडी झालीय.

## नागपूर येथील सुवर्णा डहाट राष्ट्रीय समाजभूषण पुरस्काराने सन्मानित !

आष्टी ।प्रतिनिधी

नागपूर येथील सामाजिक कार्यकर्त्या सौ. सुवर्णा रंगारी डहाट यांना शिर्डी येथे नुकताच ओम साई प्रतिष्ठान व बी.बी.सी फिल्म प्राडक्शन द्वारा राष्ट्रीय पातळीवरील समाजभूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. पी.ए.फाऊंडेशनच्या माध्यमातून प्रोजेक्ट असिस्टंट पदावर कार्यरत असून त्यांनी विविध शाळा, महाविद्यालये, संस्था, महिला बचत गट यांना प्रत्यक्ष भेटी देऊन 'महिलांच्या शारीरिक व मानसिक सुधारणेसाठी मासिक पाळी व त्यादरम्यान उद्भवणा-या समस्या व त्यावरील उपाय' यासंदर्भात महत्वपूर्ण कार्य करीत आहेत. सुमारे ८०० वर्षांपूर्वी सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामींनी आपली शिष्या उमाइसा हिच्या माध्यमातून निरूपण केलेली स्पृष्यास्पृष्यतेची वास्तविकता महिलांसमोर मांडली व एक पंथ दो काज या उक्तीप्रमाणे सुवर्णा ताईंनी




सामाजिक व धार्मिक ईष्ट, अनिष्ट रुढी परंपरांना सामोरे जात वैज्ञानिक दृष्टिकोनाचा व प्रचार- प्रसाराचा डौल साधला. त्यांच्या या उल्लेखनीय कार्यासाठी भिम आर्मी, पि.ए.फाऊंडेशन, ब्ल्यू डायमंड या संस्थांकडून त्यांचा सत्कार करण्यात आला व नागपूर नगरीत विदर्भ गौरव तसेच संभाजीनगर येथे राज्यस्तरीय समाज भूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. तद्वतच दादासाहेब फाळके चित्रपट युनियन कडून त्यांची नागपूर जिल्हा सचिव पदी नियुक्ती करण्यात आली.सुवर्णा ताईंच्या या समाज कार्यास उत्स्फूर्त प्रतिसाद लाभूनही त्या एवढ्यावरच थांबल्या नाहीत तर त्यांनी महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाकडे लक्ष पुरविले.आणि १५ महिलांना आपल्या ट्रेडिशनल कार्यात सहभागी करून त्यांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याचे काम केले आहे. त्यांनी आपल्या या कार्याला अधिक प्रभावी बनविण्यासाठी कला क्षेत्राचा देखील सहारा घेतला. डाक्युमेंट्री,बाबुजी एक संघर्ष गाथा, आशा , अजून वेळ आहे, चलचित्रीत महानुभाव भक्तिगीते, मानवंदना पथनाट्य, नाटक ( गण गण गणात बोते) अशा विविध लघुचित्रपटात वेगवेगळ्या स्त्री भुमिका त्यांनी निभावल्या किंबहुना शासकीय जनजागृती अभियानात गर्भधारणा सुरक्षा , जिल्हाध्यक्ष कार्यालय नागपूर येथे मतदार जागृती नाट्याचे सादरीकरण केले. त्यांच्या या उल्लेखनीय कार्यासाठी त्यांना राष्ट्रीय पातळीवरील समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

## सामाजिक न्याय भवनचे गुणवत्ता काम दाखवा आणि मिळवा ११ हजार रुपयाचे रोख बक्षीस

बीड ।प्रतिनिधी

डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बीड या ठिकाणी काही दिवसापूर्वी अंदाजे ९३ लक्ष रुपयाचे दुरुस्तीचे काम सुरू होते. त्यामध्ये वॉशरूम दुरुस्ती व त्यामधील पाईपलाईन, खिडक्या दरवाजे बसविणे, छताचे लिकेज काढणे, रंगरंगोटी अशा पद्धतीचे कामे होते. सदरील कामे अत्यंत निकृष्ट दर्जाचे केले असून डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बीड या ठिकाणी रंगरंगोटीचे काम केले आहे का नाही हे लक्षात येत नाही तसेच अगोदरचे सागवानी दरवाजे काढून निकृष्ट दर्जाचे दरवाजे बसवलेले आहेत तसेच वॉशरूम मध्ये दोन-तीन कडाप्पे पडलेले होते ते फक्त उभा करायची होते परंतु त्यामध्येही त्यांनी बोगस कामे केले आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता बोराडे व शाखा अभियंता भागवत यांनी संबंधित गुत्तेदारासोबत हात मिळवणी करत मापे न घेता अंदाजपत्रकात नमूद खोटे मापे जोडत मोजमाप पुस्तिका नुसार संबंधित गुत्तेदाराला बिल अदा केलेले आहे तक्रार देऊनही कारवाई केली जात नाही गुत्तेदाराच्या माध्यमातून दबाव तंत्राचा

### उप-अभियंता बोराडे, जेई भागवत व कन्स्ट्रक्शन यांच्यावर ट्रॉसिटी क्टनुसार गुन्हा दाखल करा – प्रेम कांबळे



वापर केला जातो सदर प्रकरणी सखोल चौकशी करावी. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन बीड या ठिकाणी झालेल्या दुरुस्तीच्या कामाची गुणवत्ता तपासणीसाठी त्वरित चौकशी समिती गठित करावी यासाठी कार्यालयासमोर कामे दाखवा ११ हजार रुपये रोख बक्षीस मिळवा अशा पद्धतीच्या लोकशाही मार्गाने आंदोलन करत आहे संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप-अभियंता बोराडे शाखा अभियंता भागवत व काम करणारे कन्स्ट्रक्शन यांच्यावर ट्रॉसिटी क्टनुसार गुन्हा दाखल करत शासन नियमानुसार निलंबनाची कारवाई करण्यात यावी व संबधित कन्स्ट्रक्शन यांना काळे यादीमध्ये टाकण्यात यावे अशा आशयाचे निवेदन प्रेम धर्मेंद्र कांबळे सामाजिक कार्यकर्ता यांनी प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण विभाग संभाजीनगर, कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम बीड, सहाय्यक आयुक्त समाज कल्याण बीड यांना दिले आहे.

तक्रारीचे गांभीर्य काय असते हे अधिकारी-कर्मचारी यांना चांगले ठाऊक असते कर्तव्यदक्ष प्रादेशिक उपायुक्त जयश्री सोनकवडे मॅडम यांनी माझ्या तक्रारीची तातडीने दखल घेत मा.कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक एक यांना तक्रारीतील नमूद मुद्द्याच्या अनुषंगाने प्रथम प्राधान्याने आपल्या अधीनस्थ अभियंत्यामार्फत सखोल चौकशी करून चौकशीचा अहवाल फोटोसह सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. तरी येथील कार्यकारी अभियंता व सहाय्यक आयुक्त यांना सद्बुद्धी मिळणार नाही अशी माझी धारण आहे त्यामुळे कामे दाखवा आणि बक्षीस मिळवा हे आंदोलन होणार.

प्रेम धर्मेंद्र कांबळे
सामाजिक कार्यकर्ता बीड

## माजलगाव चे विद्यार्थी राष्ट्रीय खुली कराटे स्पर्धा मध्ये पुन्हा एकदा चॅम्पियन ठरले

माजलगाव ।प्रतिनिधी

औरंगाबाद येथे नुकताच पार पडलेली चौथी राष्ट्रीय खुली कराटे स्पर्धा मध्ये. सेल्फी डिफेन्स मार्शल आर्ट अकॅडमी माजलगावचे .एकूण १४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता काताव .कुमीते . या दोन्ही प्रकार मध्ये विद्यार्थ्यांनी उच्छा आसे प्रदर्शन करून एकूण २८ पदक ची कमाई केली ज्यामध्ये स्वर्ण .पदक व कांस्यपदक. आहे . पदक पटकवलेले विद्यार्थ्यांचे नाव अजमल खान पठाण. रोहित धारक. रकम शेख. अफान शेख .आयान शेख .फरहान शेख. मयूर कंकाळ. गोविंद ढगे .सागर सर्वदे. वैभव साळवे. साद सय्यद. अर्शद सय्यद .अर्सलान सय्यद . व .मुलींमध्ये स्नेहा सरवदे .या सर्व विद्यार्थ्यांनी आपले कौशल्य दाखवून पदक पटकावले हे सर्व विद्यार्थ्यांचे




मार्गदर्शक .बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड होल्डर. रेंशि शेख मजेद सर .सेनसई श्वेता भारस्कर. सेनसई अंजली ढेरे. यांनी केले हे सर्व विद्यार्थ्यांनी आपले कौशल्य दाखवून चॅम्पियन ट्रॉफी चे मानकरी ठरले माजलगाव तालुका व बीड जिल्हाचे नाव राष्ट्रीय पातळीवर पोहोचल्या बद्दल. पालक वर्ग माजलगाव शहर ची जनता कडून या सर्व विद्यार्थ्यांचा कौतुक होत आहे

## शिव शारदा पब्लिक स्कूलचा अतुलनीय पराक्रम: क्रीडा महोत्सवात दोन्ही कप जिंकत दुसऱ्यांदा विजेतेपद!

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : शिव शारदा पब्लिक स्कूलने आपला दबदबा कायम राखत क्रीडा महोत्सवात थलेटिक्स कप आणि स्पोर्ट्स कप जिंकून सलग दुसऱ्यांदा विजेतेपद पटकावले आहे. विद्यार्थ्यांनी अप्रतिम खेळ कौशल्य आणि जिद्द दाखवत इतर सर्व स्पर्धकांवर विजय मिळवला.

मा.रणवीर अमरसिंह पंडित यांच्या संकल्पनेतून दि. ५ जानेवारी २०२५ रोजी पासून सुरू झालेल्या क्रीडा महोत्सवाचा समारोप दि. १२ जानेवारी २०२५ रोजी शिव शारदा पब्लिक स्कूलच्या भव्य क्रीडांगणावर संपन्न झाला. या क्रीडा महोत्सवात जयभवानी जगदंबा शिक्षण संस्थेतील एकूण अठरा शाळा सहभागी झाल्या होत्या तर जवळपास १८०० विद्यार्थी खेळाडूंचा समावेश होता. अंतिम थलेटिक्स सामन्याच्या वेळी बीड जिल्हा रुग्णालयाचे शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तर त्यांच्यासमवेत संस्थेचे सचिव जयसिंग पंडित, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी तथा मुख्याध्यापक प्रमोद गोरकर, सह प्रशासन अधिकारी प्रा.काशिनाथ गोगुले, शिव शारदा पब्लिक स्कूलच्या कर्तव्यदक्ष प्राचार्या श्रीमती शिल्पा क्षीरसागर यांच्यासह संस्थेचे सर्व मुख्याध्यापक, प्राध्यापक आणि शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

स्पर्धेच्या सुरुवातीपासूनच शिव शारदा पब्लिक स्कूलच्या खेळाडूंनी आक्रमक पवित्रा घेत प्रत्येक प्रकारात आपली छाप



सोडली. यात कब्बडी, व्हॉलीबॉल, खोखो, लांब उडी, गोळा फेक, २०० मी धावणे, ८०० मी धावणे, रिले, १४ व १७ वर्ष वयोगटातील मुले व मुली यांनी अतुलनीय पराक्रम केला. शिव शारदा पब्लिक स्कूलचा हा क्रीडा क्षेत्रातील यशस्वी प्रवास प्रेरणादायी आहे. शाळेने दुसऱ्यांदा दोन्ही कप जिंकून आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. ४५४ गुणांसह स्पर्धेतील सर्वोत्तम ठरलेल्या या यशामुळे शाळेच्या विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास उंचावला आहे. विद्यार्थ्यांनी दाखवलेली जिद्द, मेहनत, आणि समर्पण हेच त्यांच्या विजयाचे प्रमुख कारण आहे.शाळेच्या या यशस्वी कामगिरीमुळे शाळेच्या सर्व सदस्यांचे अभिनंदन होतेय. विशेषतः प्राचार्या शिल्पा क्षीरसागर मॅडम, क्रीडा शिक्षक ज्ञानेश्वर धापसे, विद्या राठोड आणि व्यवस्थापन यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांच्या विजयामध्ये महत्त्वपूर्ण ठरले आहे.

शाळेच्या या अतुलनीय पराक्रामुळे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष – मा.शिवाजीराव ( दादा ) पंडित, अध्यक्ष – मा.अमरसिंह पंडित, सचिव – जयसिंग पंडित, गेवराई तालुक्याचे आमदार विजयसिंह पंडित, पृथ्वीराज पंडित, शारदा स्पोर्ट्स अकादमीचे संचालक रणवीर पंडित, शाळेच्या प्राचार्या श्रीमती शिल्पा क्षीरसागर यांनी शाळेच्या विद्यार्थ्यांचे कौतुक करत अभिनंदन केले.

## मनोज जरांगे,आ.सुरेश धस,खा. बजरंग सोनवणे, आ.प्रकाश सोळंके,आ.संदिप क्षीरसागर यांची

# बदनामी केल्याने त्यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेकाने चोख प्रत्युत्तर

आष्टी ।प्रतिनिधी

स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणी आरोपीवर कठोर कारवाईची मागणी करणारे संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील,अन्याया विरुद्ध वेळोवेळी आवाज उठवणारे आ.सुरेश धस,खा.बजरंग सोनवणे,आ.प्रकाश सोळंके,आ.संदीप क्षीरसागर यांच्या प्रतिमेवर जोडे मारो आंदोलन करून या नेत्यांची बदनामी केली असल्याने पुणे,बीड जिल्ह्यासह विविध ठिकाणी या नेत्यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक करून प्रत्युत्तर देण्यात आले आहे याबाबत अधिक माहिती अशी की,



काल परळी शहरात चौकशीअंती वाल्मिक कराड याला मकोका या कायद्यान्वये विशेष चौकशी समितीने ताब्यात घेतल्यामुळे वाल्मीक कराड समर्थकांकडून बीड जिल्ह्यात संचारबंदी कायदा १४४ लागू असतानाही आरोपींच्या बाजूने चुकीच्या पध्दतीने समर्थन करून आरोपीना शिक्षा व्हावी ही सतत मागणी करणाऱ्या नेत्यांच्या प्रतिमेला काळे फासून निषेध व्यक्त करत जोडे मारो आंदोलन केले आणि या निंद्य प्रकाराचे व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित करून या सर्व नेत्यांची बदनामी केल्यामुळे स्व.संतोष देशमुख हत्या प्रकरणी अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या सर्व सर्वसामान्य लोकांच्या भावना दुखावल्या आहेत...काल परळी मध्ये जो निंदनीय प्रकार आरोपीच्या समर्थनार्थ घडला असून सर्व दोषींवर योग्य ती काय कायदेशीर कठोर कारवाई करावी यापुढेही असा प्रकार होणार नाही.या मागणीसाठी आष्टी मतदार संघातील सर्व जाती-धर्माच्या लोकांनी एकत्र येत निषेध व्यक्त करत छत्रपती शिवाजी महाराज चौक तसेच जिल्ह्यात विविध ठिकाणी संघर्षयोद्धा मनोज जरांगे, आ.सुरेश धस, खा. बजरंग सोनवणे,आ.प्रकाश सोळंके,आ.संदीप क्षीरसागर यांच्या प्रतिमेला दुग्धाभिषेक करून स्वर्गीय संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशी द्या अशा घोषणाबाजी करत अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या नेत्यांना समर्थन दिल्याचे पाहायला मिळाले. यावेळी आष्टी पोलीस स्टेशन येथे पोलीस निरीक्षक श्री शरद भुतेकर यांना आणि आष्टी उपविभागीय पोलीस अधिकारी श्री बाळकृष्ण पाटील हणपुडे यांच्याकडे मनोज रंगे पाटील आमदार सुरेश धस खासदार बजरंग सोनवणे आमदार प्रकाश सोळंके आणि आमदार संदीप क्षीरसागर यांची बदनामी करणाऱ्या या व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी या मागणीचे स्वाक्षऱ्या केलेले

निवेदन दिले..

## माध्यमिक विद्यालय मारफळा शाळेचा ग्रेड चित्रकला परीक्षेत १००% निकाल


टाकरवन /प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील मारफळा येथील माध्यमिक विद्यालय कला संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई आयोजित सप्टेंबर/ऑक्टोबर २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या एलिमेंटरी व इंटरमिजीएट चित्रकला परीक्षेचा निकाल नुकताच घोषित झाला. या दोन्ही परीक्षेत विद्यालयाचे प्रविष्ठ झालेले सर्वच विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

एलिमेंट्री परीक्षेसाठी या वर्षी एकूण १८ विद्यार्थी बसले होते,त्यामध्ये ८ वी चे अंजली घाडगे,भक्ती घाडगे,पूजा कुटे, कार्तिकी कबले,हर्षदा कबले,अंकिता गोपने,आरती उबाळे,निशा पवार,अनुष्का पवार, पूनम राठोड,रोहिणी राठोड,काजल राठोड,सुशील झाडगे व शुभम राठोड हे १४ विद्यार्थी इ ग्रेड सह विशेष प्राविण्याने उत्तीर्ण झाले आहेत तर स्वाती पवार, ऐश्वर्या पवार,अक्षरा चव्हाण व राहुल राठोड हे ४ विद्यार्थी उ ग्रेड घेऊन उत्तीर्ण झाले.

इंटरमिजीएट परीक्षेत या वर्षी एकूण १६ विद्यार्थी प्रविष्ठ झाले होते त्यापैकी सोनाक्षी राठोड, राणी राठोड,वैष्णवी गिरी,अक्षरा कुटे,विशाल झाडगे,अभिषेक झाडगे व प्रद्रुम्न पिंगळे या ७ विद्यार्थ्यांनी इ ग्रेड घेऊन विशेष प्रावीण्य मिळवले तर अक्षरा वायसे,नंदिनी घाडगे,ऐश्वर्या चव्हाण, काजल राठोड,अमृता कबले,साक्षी उबाळे,अश्विनी चव्हाण, विशाल राठोड व सय्यद अन्वर हे ९ विद्यार्थी उ ग्रेड सह उत्तीर्ण झाले.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेचे मुख्याध्यापक श्री.पवार बी.टी.सर,परीक्षा विभाग प्रमुख श्री.शेळके सत्यवान सर,जेष्ठ सहशिक्षक श्री.ठोंबरे सर,श्री.गायकवाड सर,श्री.उनवणे सर,श्री.शेख सर,श्री.ढगे सर, श्री.हिंगे सर,कु.अनुजा खेत्रे मॅडम तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी श्री.वक्ते मामा श्री.गोपाळ कुटे आदींनी अभिनंदन केले आहे.



ग्रामस्थांच्या वतीने जेष्ठ शालेय समिती अध्यक्ष मा. श्री.गुलाबराव कुटे सरपंच मा.श्री.शरद भाऊ कबले आदींनी शाळेचे व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.या यशाबद्दल जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष मा . श्री . शिवाजीराव ( दादा ) पंडीत व संस्थेचे अध्यक्ष मा . श्री . अमरसिंहजी पंडित साहेब व संस्थेचे सचिव मा.श्री.जयसिंग (भाऊ) पंडित, गेवराई तालुक्याचे आमदार मा .श्री .विजयराजे पंडीत साहेब व शारदा अकॅडमीचे अध्यक्ष मा.श्री.रणवीर (काका) पंडित, मा. श्री . पृथ्वीराजे (बाळदादा ) पंडीत,प्रशासकीय अधिकारी श्री.गोरकर सर,श्री.गोगुले सर,श्री. हातोटे सर यांनीही विद्यार्थ्यांचे व विद्यालयाचे अभिनंदन केले आहे.

## कामगार व त्याच्या कुटुंबियांना कौशल्यवृद्धी २०२५ साठी कामगारांनी प्रशीक्षण लाभ घ्यावे- नगरसेवक अमर शेख

बीड ।प्रतिनिधी

बांधकाम क्षेत्रातील कामगारांची उत्पादन क्षमता व रोजगार क्षमता वाढविण्यासाठी सदर योजना सुरु करण्यात आलेली आहे ज्यामध्ये कामगारांना एकूण ६ विषयाचे प्रशिक्षण दिले जाते. १) बार वेल्डिंग २)मेसेनरी ३)शटरिंग कारपेंटिंग ४)प्लम्बिंग ५) पेंटींग ६) स्कॅफोल्डिंग , कामगारांनी योजनेच लाभ घ्याव असे अमर शेख यांनी आव्हान केले

पुढे बोलताना महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटनेचे अध्यक्ष नगरसेवक अमर शेख म्हणाले महाराष्ट्र इमारत व इतर



बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या कौशल्यवृद्धी प्रशिक्षण कार्यक्रमामुळे कामगार आणि त्यांच्या कुटुंबियांना खालीलप्रमाणे अनेक फायदे मिळू शकतील.कौशल्यवृद्धी योजना अंतर्गत प्रशिक्षणाचा खर्च प्रशिक्षणाचा खर्च प्रति तास २७/- रुपये म्हणजे एकूण १२० तासाचे ३,३००/- रुपये प्रति प्रशिक्षणार्थी व पगार नुकसान भरपाई म्हणून ३५/- रुपये प्रति तास म्हणजे एकूण १२० तासाचे ४,२००/- रुपये कामगारांना देण्यात येनार जिल्ह्यातील नोंदीत कामगारांनी योजनेचा लाभ घ्यावा असे आव्हान महाराष्ट्र बांधकाम मजूर संघटनेचे अध्यक्ष अमर शेख यांनी केले

## तिगावमध्ये लढा दुष्काळाशी फाउंडेशनच्या वतीने मकर संक्रांतीनिमित्त गावातील पाचशे महिलांना एक अनोखी भेट

सौ,अर्चनाताई राज पाटील यांनी महिलांना संक्रांतीनिमित्त दिले पुस्तक आणि वृक्ष भेट

वडवणी ।अमोल मुजमुले

वडवणी तालुक्यातील तीगाव ग्रामपंचायत कार्यालय या ठिकाणी मकर संक्रांतीनिमित्त या गावच्या विद्यमान सरपंच सौ अर्चनाताई राज पाटील यांनी, महिलांसमवेत एक आगळीवेगळी मकर संक्रात साजरी केली आहे, या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायत कार्यालय च्या प्रांगणामध्ये एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, या ठिकाणी गावातील सर्व महिला एकत्रित करून



त्या महिलांना संक्रांतीनिमित्त, प्रत्येक महिलेला एक झाड ,एक पुस्तक ,एक अनोखी भेट या गावच्या विद्यमान सरपंच सौ, अर्चनाताई राज पाटील यांनी भेट दिली आहे, दरवर्षीप्रमाणे याही वर्षी आगळावेगळा सामाजिक उपक्रम ते सातत्याने करत असतात, या आगळ्यावेगळ्या उपक्रमाची चर्चा जिल्हाभरात होत आहे,

## ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयात ज्ञानदीप क्रीडा महोत्सव चे शिक्षणाधिऱ्यांच्या हस्ते उद्घाटन

### शरीर सुदृढ व बळकट होण्यासाठी शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग घेणे गरजेचे - शिक्षणाधिकारी फुलारी

धारूर / प्रतिनिधी

धारूर तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयात प्रजासत्ताक दिनानिमित्त क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. यावेळी शरीर सुदृढ व बळकट होण्यासाठी शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग घेणे गरजेचे असल्याचे मत प्राथमिक शिक्षणाधिकारी भगवानराव फुलारी यांनी व्यक्त केले.

धारूर तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयात प्रजासत्ताक दिनानिमित्त क्रीडा महोत्सव २०२४ - २५ चे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन शिक्षणाधिकारी भगवानराव फुलारी व सहाय्यक पोलिस निरिक्षक देविदास वाघमोडे यांच्या हस्ते विद्यालयाच्या प्रांगणात करण्यात आले. प्रथम कार्यक्रमाची सुरुवात खाशाबा जाधव व माता सरस्वती प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. या कार्यक्रमासाठी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रमुख शिक्षण विस्तार अधिकारी गणेश गिरी तर



प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी अंडिल, उपप्राचार्य मिलिंद गायकवाड, केंद्रप्रमुख सय्यद हकीम, व्यंकटेश गडदे, दत्तात्रय कोकणे, रामहारी गांधले, क्रीडा संयोजक लहु गव्हाणे, ज्येष्ठ पत्रकार चंद्रकांत देशपांडे, सय्यद शाकेर, हे मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्राथमिक शिक्षण अधिकारी बीड भगवानराव फुलारी यांनी विद्यार्थ्यांना आपले शरीर सुदृढ व बळकट बनवण्यासाठी शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये सहभाग घेणे गरजेचे आहे असे सांगत मार्गदर्शन केले. तर सहाय्यक पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळण्यासाठी शालेय क्रीडा स्पर्धा मुख्य व्यासपीठ आहे. उपप्राचार्य गायकवाड यांनी विद्यार्थ्यांचे स्काऊट गाईड संचलन पाहून भारावून गेल्याचे सांगत भविष्यात विद्यार्थ्यांनी एनसीसीत येवुन राष्ट्रीय पथसंचलनात सहभागी होण्याचे आवाहन केले. नंतर विद्यालयातील खोखो व कबड्डी सामन्यांचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करून क्रीडा स्पर्धेची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा प्रमुख मुंजाराम निरडे तर प्रस्ताविक सचिन चव्हाण यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## शिवसंग्रामच्या दणक्याने नगर रोडच्या कामास गती

### शहर उपाध्यक्ष नदीम गणी यांनी दिला होता आंदोलनाचा इशारा

बीड ।प्रतिनिधी

शहरातून जाणाऱ्या बीड नगर रस्त्याचे काम अगोदरच संथगतीने चालू असतानाच संबंधित यंत्रणेने नोटीस दिली असतानाही नगरपालिका प्रशासनाने बालेपीर रोडवरील पाईप न हलवल्याने रस्ता कामास अडथळा निर्माण होऊन उशीर होत होता.या संदर्भात शिवसंग्रामचे शहर उपाध्यक्ष शेख नदीम गणी यांनी पाठपुरावा करून आंदोलनाचा इशारा दिला होता.



बालेपीर परिसरातील रोडचे काम खोदकामातील पाईप हटवण्याच्या अनुषंगाने थांबवण्यात आलेले होते. नगरपालिका प्रशासनास याबाबत संबंधित यंत्रणांनी कळवले असतानाही त्यांनी कुठलीच कार्यवाही केली नव्हती. याबाबत विचारणा केली असता संबंधित अधिकारी कर्मचारी उडवा उडवीची उत्तरे देत होते. यावेळी शिवसंग्रामचे शहर उपाध्यक्ष शेख नदीम गणी यांनी योग्य पाठपुरावा करत बीड नगर रोडवरील बालेपीर येथील खोदकामात अडथळा होत असलेले पाईपलाईन हटवण्यास नगरपालिका प्रशासनास वेळ मिळेल का? असा प्रश्न उपस्थित करून शिवसंग्राम स्टाईल आंदोलन करण्याचा इशारा दिला होता. याची दखल घेत नगरपालिका प्रशासनाने नगर रोडवरील पाईप लाईन वेळेत हटवल्याने संथ गतीने चालू असलेल्या नगर रोडवरील रस्त्याचे कामास गती प्राप्त झाली आहे. शिवसंग्रामच्या इशाऱ्यानंतर सुरू झालेल्या कामाबाबत बिडकरांनी समाधान व्यक्त केले आहे.

# वाढदिवस अभिष्टचिंतन

**मराठवाड्यातल्या गोदा पट्ट्यातील रांजेगाव ता.जि. बीड सुपुत्र आदरणीय अंगद चंद्रकांत आबुज(पाटील)राज्य पुरस्कार- महात्मा ज्योतिबा फुले आदर्श शिक्षक पुरस्कार २०२३ व दुर्गा सोशल फाउंडेशन निर्मित सोलापूर राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२४ चे मानकरी.श्री. अंगद सर म्हणजे एक आगळंवेगळं व्यक्तिमत्व खूप धाडशी व जिद्दी पण स्वभावाने प्रेमळ व दानशूर माझी मैत्री ही अगदी २०१० पासून... महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे येथे एका महामोर्चात पहिल्यांदाच भेटलो! त्यानंतर अनेक मोर्चे,उपोषण असा संघर्षमय प्रवास त्यांच्यासोबत लाभला आणि त्यातून एक जिव्हाळा पूर्ण मैत्रीचा उगम झाला.**

योग असा की संघर्षानंतर आम्हाला दोघांनाही जिल्हा परिषद रत्नागिरी हाच सांकेतांक मिळाला आणि एका आनंदाची ज्योत पुन्हा रत्नागिरी जिल्ह्यात आली..परत एका तालुक्यात आणि एका बिटातच हा दुर्मिळ योग आमच्या सोबत लाभतच गेला... रत्नागिरी जिल्ह्यात त्यांनी प्रथमतः महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ या संघटनेत प्रवेश करून जिल्यात शिक्षणसेवक जिल्हा प्रतिनिधी झाले....आणि कार्याला प्रारंभ सुरू झाला. राजकारणात त्यांचे आदर्श हे स्व.विनायकरावजी मेटे साहेब...साहेबांचे खूप विश्वासू म्हणून संपूर्ण बीड जिल्ह्यात ओळख, शिक्षण सेवक मानधन वाढवण्याबद्दल त्यांनी आम्हाला मंत्रालयात घेऊन गेलं तेथील विनायकरावजी मेटे साहेब यांच्या बंगल्यावर जाऊन साहेबांची भेट करून दिली.तसेच अनेक मंत्र्यांच्या भेटी करून दिल्या व शिक्षण सेवक मानधन या बद्दल एक परिपूर्ण लढा उभा केला आणि ते यशस्वी करून दाखविले संपूर्ण महाराष्ट्रात शिक्षण सेवक मानधन वाढ बाबत श्री अंगद अबूज सरांना ओळखलं जातं ही वस्तुस्थिती आहे. जुनी पेन्शन बाबत वेळोवेळी शासनाला पत्र देणे स्मरणपत्र देणे त्याविषयी आंदोलने करण्याचे कार्य सुद्धा अतिशय हिरारीने सहभाग घेऊन केले. मुख्य म्हणजे शिक्षकांच्या जिव्हाळ्याचा विषय आंतरजिल्हा बदली यामध्ये अनेक निवेदने त्यांची आजही चालूच आहेत शिक्षकांच्या सर्वतोपरी प्रश्नांना उजाळा देण्यासाठी शासनाच्या समोर अगदी खंबीरपणे शिक्षकांची बाजू आजही ते मांडतच असतात. रत्नागिरी जिल्ह्यात शिक्षकांचे भरपूर संघटना आहेत आणि प्रत्येक संघटनेत आबुज सरांची ओळख विशेष आहे हे त्यांचं मितभाषी स्वभाव त्यांचे.. शिक्षकांविषयी केलेले अनेक पत्रे व व्हिडिओ फोटो माझ्याकडे आजही पुरावे म्हणून आहेत. आबुज सरांना समाजकार्याची खूप आवड, गरजवंतांना मदत करणे गोरगरिबा विषयी कणव बाळगणे दिनदुबळ्याच्या भावनांना उजाळा देणे हा त्यांचा मूळ स्वभावच...कारण




रंजेगाव ग्रामपंचायत तिची स्थापना ते आज तागायत तेथील राजसत्ता त्यांच्याच घराण्यात आहे. म्हणून राजकीय वारसा लाभलेली व्यक्ती म्हणणे यात काही शंका नाही... त्यांनी स्वर्गीय विनायक राव जी मेटे साहेबांना राजापूरच्या शिक्षक पतपेढीला भेट देऊन आर्थिक मदत करण्याचे आश्वासन सुद्धा दिले होते परंतु दुर्दैव असं की साहेबच आमच्यात आज नाही ही खंत सरांच्या मनात सतत असते मी काय कमवलं तर ते सांगतात की मी माणसं कमवलं... समाजकार्यात श्री माऊली इंग्लिश स्कूल ची स्थापना त्यांच्या संपूर्ण सर्कलमधील अनेक विद्यार्थी जे की ऊस कामगार, शेतकरी, कष्टकरी यांच्या मुलाला घडवण्याचे कार्य केलं... त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात आल्यापासून सतत पाच वर्षे झाली प्रत्येक वर्षी बीटाचे हिवाळी क्रीडा स्पर्धेचे बक्षिसे वितरण करतात तसेच कोकणातील गोरगरिबांच्या मुलांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय शैक्षणिक साहित्य मोफत देतात हे त्यांचं दानशूर पणा मी कधीही विसरू शकत नाही... मैत्रीच्या बाबतीत अनेक असे प्रसंग आहेत की त्यांनी वेळोवेळी मदतच केलेली आहे.. येथील सर्व शिक्षकांचा त्यांचा मोठा ग्रुप आहे ते दररोज सर्व शिक्षकांच्या तालुक्यातील जिल्ह्यातील प्रश्नाविषयी चर्चा करत असतात आणि त्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील असतात स्वतःच्या गरजा इच्छा आकांक्षा ते बाजूला ठेवून मित्रांसाठी सतत प्रयत्नशील असतात अशा दोस्तीतल्या दुनियेतला एक दिलदार व्यक्तिमत्व आमचा सच्चा मित्र श्री अंगद आबुज सरांना वाढदिवसाच्या खूप खूप शुभेच्छा राष्ट्रमाता राजमाता जिजाऊंच्या कृपेने आपणास उदंड आयुष्य लाभो हीच सदिच्छा

शुभेच्छुक

बलभिम दत्तात्रय पाटील

राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार महात्मा ज्योतिबा फुले.. जि. प. प्रा.आदर्श शाळा प्रिंदावण नं.१ ता.राजापूर जि.रत्नागिरी

# भारत सरकारच्या नोटरी पदी अँड राहुलकुमार सुरेशचंद्र राका यांची नियुक्ती

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : येथील दिवाणी व फौजदारी न्यायालय येथील व भारतीय जनता पार्टीचे प्रांत सदस्य सुरेश भाऊ राका यांचे चिरंजीव अँड राहुलकुमार राका यांची भारत सरकारच्या नोटरी पदी नियुक्ती झाली.भारत सरकारने विधी व न्याय विभागाने सन २०२१ मध्ये नोटरी पब्लिकची जाहिरात काढून वकील उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले होते. राज्यातील वकील उमेदवार यांच्याकडून अर्ज प्राप्त झाल्यानंतर पात्र उमेदवारांच्या २०२३ मध्ये मुलाखती घेण्यात आल्या होत्या २०२५ ला जानेवारी मध्ये सदर नोटरी पदाकरता भाजपाचे ज्येष्ठ नेते मा. प्रांत सदस्य सुरेश भाऊ राका यांचे चिरंजीव भाजपा सरचिटणीस तथा दि वैद्यनाथ बँक सल्लागार व दैनिक बीड वास्तव चे उपसंपादक अँड राहुलकुमार राका यांनी विधी व न्याय विभाग दिल्ली यांच्याकडे अर्ज केला होता. यामध्ये पात्र ठरून त्यांची संबंधित विधी व न्याय विभागाकडून मुलाखत घेण्यात आली होती सदर मुलाखतीमध्ये यश मिळाल्यानंतर ड राहुलकुमार सुरेशचंद्र राका यांची भारत सरकारच्या



पब्लिक नोटरी पदी निवड झाली आहे. ड राहुलकुमार राका २००९ मध्यें वकिली परीक्षा पास झाले होते . त्यांच्या या निवडीबद्दल हिंदुस्तानचे पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी ,विधी व न्याय मंत्री अर्जुन राम मेघवालजी , रस्ते व वाहतूक मंत्री श्री .नितीनजी गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखरजी बावनकुळे, माजी मंत्री आ. सुधीरभाऊ मुनगंटीवार,पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई गोपीनाथराव मुंडे, दबंग माजी खासदार डॉ. प्रितम ताई गोपीनाथराव मुंडे, माजी अर्थराज्यमंत्री भागवत कराड, माजी रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, दिल्ली येथील स्वीय सहाय्यक नायर साहेब, परळी येथील स्विस सहाय्यक लोढाजी भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष नोटरी ड संगीताताई धसे , गेवराई न्यायालयातील नोटरी ड विलासराव पाटील यांचे नोटरी कामी सहकार्य व शिफारस पत्र दिल्याबद्दल नवनियुक्त नोटरी अँड राहुलकुमार सुरेशचंद्र राका यांनी वरील सर्वांचे आभार व्यक्त केले. त्यांच्या या निवडीबद्दल डॉक्टर , संभाजीनगर -बीड- गेवराई येथील वकील मंडळी व पत्रकार मित्र भाजपा-भाजयुमो मित्र व सर्व पक्षातील संघटनेतील मित्रपरिवाराने पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या आहेत . लवकरच भारत सरकार नोटरीचे सुसज्ज कार्यालय तहसील परिसरात जुने गेट समोर जनतेच्या सेवेकरता उघडण्यात येणार व दर्जेदार सेवा देणार असल्याची माहिती

# विनापरवाना जिलेटीन कांड्याची वाहतूक करणाऱ्या वाहनावर कारवाई करावी : दीपक सोनवणे

**आष्टी ।प्रतिनिधी**

**विहीर ,रस्ता, खडक ,फोडण्यासाठी वापर केला जाणारा जिलेटीन कांड्या घेऊन वाहनातून खुल्या आम विक्री केली जात आहे ही स्फोटके बेवारसपणे रस्त्याच्या बाजूला तसेच ज्या भागात काम सुरू आहे त्या ठिकाणी उघड्यावर ठेवली जात आहेत बीड ,अहिल्यानगर ,राष्ट्रीय महामार्ग बीड धामणगाव राज्य महामार्ग हे दोन्ही मार्ग आष्टी तालुक्यातून जातात याच रस्त्यावरून मोठ्या प्रमाणावर जिलेटिन कांड्या घेऊन बंद वाहने सुसाट जात आहेत आष्टी तालुक्यातील अनेक गावात सध्या विहीर खोदकाम करण्याचे काम सुरू आहे या कामावर या जिलेटीन कांड्या पुरवल्या जातात किती माल मागवला जातो**

याचा काही हिशेब ठेवला जात नाही मग हे खोदकाम करताना एखादा स्पोट होऊन जर दुर्दैवी घटना घडली तर याला जबाबदार कोण प्रशासनाकडून जिलेटीनचे वाहतूक करणाऱ्या वाहनाची तपासणी होत नाही हे विशेष जिलेटिन च्या काड्या कशासाठी होतो वापर फोटो म्हणून केला जातो विशेषता खाणकाम, विहीर, उत्खनन ,रस्ते किंवा इतर काम दरम्यान अडथळा ठरणारे दगड ,किंवा खडक फोडण्यासाठी जिलेटीन यांचा वापर केला जातो यामध्ये मोठे छिद्र करून त्यामध्ये जिलेटिन च्या काड्या ठेवल्या जातात त्यानंतर वात पेटून स्पोट केला जातो याची सखोल चौकशी करून विनापरवाना वापर तसेच जिलेटीन कांड्याची वाहतूक करणाऱ्या वाहनावर कारवाई करावी असे मागणी शिवक्रांती सेनेची युवक प्रदेशाध्यक्ष दीपक सोनवणे यांनी केली आहे

# वाल्मीक कराडच्या पिंपरी चिंचवडमधील फ्लॅटचा लिलाव होणार?

पुणे (प्रतिनिधी)

पुणे शहरातही वाल्मिक कराड याने मोठ्या प्रमाणावर संपत्तीची खरेदी केल्याचा आरोप होत आहे. त्याचवेळी त्याने पुण्यातील पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचा मिळकत कर थकवल्याचा प्रकार समोर आला आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवड मनपाने त्याचा फ्लॅट जप्त करुन त्याचा लिलाव करण्याचा निर्णय घेतला आहे.

पिंपरी चिंचवडच्या पार्क स्ट्रीट या उच्चभ्रू सोसायटीतील वाल्मिक कराड याचा फ्लॅट आहे.



१६ जून २०२१ ला वाल्मिक कराड आणि पत्नी मंजली वाल्मिक कराड याच्या नावे या फ्लॅटची नोंदणी झाली. मात्र तेव्हापासून वाल्मिक कराड याने मिळकत कर थकवला आहे. १ लाख ५५ हजार ४४४ रुपयांचा हा मिळकत कर थकवल्याप्रकरणी पालिकेने वाल्मिक कराडला नोटीस ही पाठवली आहे. २१ नोव्हेंबर २०२४ ला धाडलेल्या नोटिशीनंतर ही कर न भरल्यानं आता हा फ्लॅट सील केला जाईल, असे पिंपरी चिंचवड महानगर पालिकेचे कर संकलन विभागाचे प्रमुख अविनाश शिंदे यांनी सांगितले.नोटीस पाठवल्यानंतर वाल्मिक कराड याने त्याला उत्तर दिले नाही किंवा कर भरला नाही. त्यामुळे त्याचा फ्लॅट सील केला जाणार आहे. मग त्याचा लिलाव ही केला जाईल, असे कर संकलन विभागाचे प्रमुख अविनाश शिंदें यांनी सांगितले.

# पतंगाच्या नायलॉन मांजाने घेतला तिघांचा बळी



मुंबई (प्रतिनिधी)

नायलॉन मांजामुळे गळा चिरला जाऊन मंगळवारी तिघे जण मृत्युमुखी पडले. असतानाच नाशिक, वसई आणि नंदुरबार शहरात दुचाकीवरून जाणाऱ्या निष्पाप लोकांचा यात बळी गेला. नाशकात संक्रांतीसाठी कुटुंबीयांना भेटण्यासाठी गुजरात येथून दुचाकीवरून येत असताना पाथर्डी गावाजवळ मांजाने गळा चिरला गेल्याने सोनू किसन धोत्रे (२३, रा. चारणवाडी, देवळाली कॅम्प) याचा जागीच मृत्यू झाला. त्याचा विवाह मेमध्ये होणार होता. नंदुरबारमधील नळवे रस्त्यावर आजोबांसोबत दुचाकीने जाणाऱ्या सातवर्षीय कार्तिक एकनाथ गुरवे या चिमुकल्याचा मृत्यू झाला.

अकोला शहरात पोलिस अधीक्षक कार्यालयासमोर उड्डाणपुलावर दुचाकीस्वाराला मांजाचा फास बसून किरण प्रकाश सोनवणे (३४) याचा तडफडून त्याचा मृत्यू झाला.

# अजित दादा धनंजय मुंडे टोळ्या चालवणारा, उघडा पडला

जालना : बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणी वाल्मिक कराडच्या मुसक्या आवळल्यानंतर धनंजय मुंडे यांच्याही अडचणीत आणखी भर पडली आहे. बीड सत्र न्यायालयाने वाल्मिक कराडला ७ दिवसांची एसआयटी कोठडी सुनावली असून २२ जानेवारीपर्यंत पीसीआर देण्यात आली आहे.

परिणामी मराठवाड्यातील बीड परळीसह इतर गावात हे



प्रकरण अधिकच तापले आहे. दुडारीकडे याप्रकरणी विरोधी पक्ष आणि भाजपचे नेतेही धनंजय मुंडे यांच्यावर निशाणा साधत असून त्यांच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. अशातच मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी थेट उपमुख्यमंत्री अजित पवारांचे नाव घेत धनंजय मुंडे टोळ्या चालवणारा नेता असून त्यांना राज्यात दंगली घडवायच्या आहेत. असा गंभीर आरोप केला आहे. मात्र आरोपी वाचवा म्हणून काही नेत्यांनी फोन केला असणार, परंतु हे सर्व आरोपी आणि यात पाठबळ पुरवणारे सर्व चार्जसीटमध्ये आले पाहिजे. धनंजय मुंडेची टोळी संपली पाहिजे. अंडर ट्रायल केस झाली पाहिजे. जातिवाद आणि दंगली घडवून आणणारी प्रचंड मोठी टोळी धनंजय मुंडे यांची आहे. माननीय न्यायालयाने सात दिवसाची पोलीस कोठडी दिल्यानंतर एसआयटी आणि सीआयडी कसून तपास करणार आहे. यांनी एकमेकांना व्हिडिओ दाखवल



इंदापूर तालुक्यातील कर्मयोगी शंकररावजी पाटील सहकारी साखर कारखाना आणि निरा भिमा सहकारी साखर कारखाना शहाजी नगर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील शिरसटवाडी आणि निमसाखर गावाच्या परिसरातील ११० ऊसतोड मजुरांची मोफत आरोग्य तपासणी संपन्न.आज वार बुधवार दिनांक १५/१/२०२५ रोजी सकाळी.८.३० वाजता कर्मयोगीच्या कार्यक्षेत्रातील विभाग. शेळगांव विभागाच्या परिसरातील शिरसटवाडी च्या जवळी ऊसतोड मालक. सुरेश गजानन कदम , भागवत शिंगाडे, टोळी मालक. अशोक बबनराव जगताप, नवनाथ कृष्णा कदम, आणि नीरा भीमा सहकारी साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील शिरसटवाडी, निमसाखर, गावाच्या परिसरातील फड मालक. अंबादास आबाजी कदम, युवराज सर्जेराव रणमोडे .टोळी मालक. सोमीनाथ गेना सांगळे, विठ्ठल एकनाथ गायकवाड, गणेश भास्कर गायकवाड, किसन नामदेव गायकवाड, या सर्वांच्या उपस्थितीमध्ये ऊसतोड मजुरांची आरोग्य तपासणी करता वेळी निरा भिमा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन माननीय श्री लालासाहेब पवार यांच्या शुभहस्ते आरोग्य तपासणी सुरुवात झाली त्याप्रसंगी कर्मयोगीचे शेळगाव विभागाचे विभाग प्रमुख माननीय श्री ए बी जगताप साहेब तसेच निरा भिमा चे काटी विभागाचे प्रमुख माननीय श्री भागवत पाटील साहेब, कर्मयोगी चे कर्मचारी पिंटू शिंदे साहेब, मुलानी एस एम साहेब, निरा भिमाचे कर्मचारी सचिन घोरपडे साहेब, घोरपडे राजेंद्र साहेब, निंबाळकर शामराव साहेब, यांच्या मार्गदर्शनाखाली आजची आरोग्य तपासणी संपन्न झाली. निमसाखर गावातून इंदापूर कडे जात असताना निमसाखर गावातील गणेश पंढरीनाथ धनवडे दिव्यांग यांच्या घरी जाऊन डॉक्टरांनी तपासणी करून मोफत औषधी दिली. त्यावेळेस गणेश धनवडे यांचे आई-वडील उपस्थित होते. केंद्राच्या प्रमुख डॉक्टर सारंगी कुंभार मॅडम नर्सरी गौरी राठोड, सानिका फुलारी वॉर्डबोय आनंद नलावडे केंद्राचे प्रमुख महादेव चव्हाण सर आणि शिवाजीराव गोफणे यांच्या उपस्थितीमध्ये आजची आरोग्य तपासणी संपन्न झाली.

# ३४ मान्यवरांना जनविकास परिवर्तन आघाडीच्या वतीने पुरस्कार देऊन केले सन्मानित

केज/प्रतिनिधी

सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ मासाहेब यांच्या संयुक्त जयंती निमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ३४ मान्यवरांना जनविकास परिवर्तन आघाडीच्या वतीने पुरस्कार देऊन केले सन्मानित करण्यात आले.केज शहराच्या विकासासाठी अहोरात्र तत्पर असल्याचे प्रतिपादनहारूणभाई इनामदार यांनी केले आहे. यापुढे शहरातील शंभर बचत गटाला व्यवसायासाठी निधी केज नगरपंचायत च्या माध्यमातून उपलब्ध करणार करणार आहोत असे नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांनी बोलताना सांगितले आहे.सावित्रीबाई फुले व राजमाता राष्ट्रमाता मासाहेब जिजाऊ यांच्या संयुक्त जयंतीचे औचित्य साधत. जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार केज नगरपंचायतच्या नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांच्या संकल्पनेतून समाजातील सामाजिक,राजकीय,सांस्कृतिक, अध्यात्मिक,शैक्षणिक,क्रीडा, वैद्यकीय,प्रशासकीय,पत्रकारिता, उद्योजक, संशोधन, गायन इत्यादी क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ३४ मान्यवरांना जनविकास परिवर्तन आघाडीच्या वतीने पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे.









या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड तर प्रमुख पाहुणे म्हणून जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारूणभाई इनामदार, गटनेते भाऊसाहेब गुंड, गटनेते राजूभाई इनामदार, नगरसेवक जलालभाई इनामदार, नगरसेवक खैसरभाई इनामदार, नगरसेविका सौ. पद्मिनी अक्का शिंदे,नगरसेविका सौ.पल्लवीताई रांजणकर, नगरसेवक बाळासाहेब गाढवे, नगरसेवक मुस्तफा शेट खुरशी, नगरसेवक युनूसभाई शेख, युवा नेते लखन हजारे यांची प्रमुख उपस्थिती होती.सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महामानवाच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून धूपदीपाने पूजा करून दिपप्रज्वलन करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांचे जनविकास परिवर्तन आघाडीच्या व केज नगरपंचायतच्या वतीने शाल,श्रीफळ,पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी शहरातील १० बचत गटाला केज नगरपंचायत च्या पुढाकारातून आयसीसी बँके कडून ८० लाख रुपयांचे कर्ज वाटपाचे पत्र देऊन बचत गटांच्या महिलांचा सन्मान करण्यात आला.यावेळी मनोगत व्यक्त करताना हारुणभाई इनामदार यांनी सांगितले की, केज शहरातील अनेक मुख्य रस्त्याचे व गल्लीतील रस्त्याचे कामे करण्यात आली आहेत. त्याचबरोबर बाराशे घरकुल मंजूर करून आणले आहेत दोनशेहून अधिक घरकुलाचे कामे चालू आहेत लाभार्थ्यांच्या खात्यावर पैसे वर्ग करण्यात आले आहेत तर उर्वरित घरकुलांची कामे देखील लवकरच चालू करण्यात येणार आहेत. पुढे बोलताना इनामदार म्हणाले की, केजच्या भूमीमध्ये जन्म घेऊन विविध क्षेत्रांमध्ये अनेक मान्यवरांनी कौतुकास्पद कार्य करून केजची मान उंचावली आहे त्यांचा सन्मान करणे हे आमचे आद्य कर्तव्य आहे म्हणून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला आहे व त्यांचा गुणगौरव करण्याचा आम्हाला योग आला व आमच भाग्य मोठे आहे की, आम्हाला सर्वांची सेवा करण्याचा एक योग आला आहे. केज शहराच्या विकासासाठी आमची जनविकास परिवर्तन आघाडी आम्ही अहोरात्र तत्पर आहोत शहराच्या विकास कामासाठी आम्ही कुठेच कमी पडणार नाहीत असे बोलताना त्यांनी स्पष्ट केले आहे.अध्यक्षीय समारोपप्रसंगी नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड म्हणाल्या की, महिलांनी स्वतःच्या पायावर उभा राहण्यासाठी बचत गटाच्या माध्यमातून विविध व्यवसाय करून स्वतः स्वतःच्या पायावर उभा टाकावे नगरपंचायत च्या माध्यमातून महिलांना बचत गटाच्या माध्यमातून व्यवसाय करण्यासाठी लागणारी सर्व मदत आम्ही करण्यास कटिबद्ध आहोत. महिलांना व्यवसाय करण्यासाठी विविध बँकेचे कर्ज उपलब्ध करण्यासाठी नगरपंचायत सक्षम आहे परंतु महिलांनी कर्जाची परतफेड वेळेत करावी जे बचत गट वेळेत कर्ज फेडतील त्यांना लागेल तेवढे कर्ज उपलब्ध करून देण्यात येत आहे. यापुढे शंभर बचत गटाना नगरपंचायत च्या माध्यमातून कर्ज उपलब्ध करून देणार आहोत. पुढे बोलताना बनसोड म्हणाल्या की, मागील तीन वर्षापासून नगरपंचायतची सत्ता आमच्या हाती आल्यापासून आम्ही केज शहराचा विकास मोठ्या प्रमाणात केला आहे. यापुढेही राहिलेली सर्व कामे पूर्ण करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करून उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले.

जनविकास परिवर्तन आघाडीच्या वतीने प्रा.डॉ.हनुमंत सौदागर प्रा.डॉ.शंकर वाघमारे,

प्रा.डॉ.बी.जे. हिरवे, डॉ.ह.भ.प. छत्रभुज वायबसे, पत्रकार रामदास तपसे, तात्या गवळी, दशरथ चवरे, श्रीमती जनाबाई खाडे, प्रा.डॉ. नवनाथ काशीद, अनिल वैरागे, दत्तात्रय मजमुले, सामाजिक कार्यकर्त्या तसलीम शेख, श्रीमती पूजा शिरसाट, श्रीमती संगीता खंडाळे यांच्यासह ३४ मान्यवरांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाल पुष्पगुच्छ सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.यावेळी केज नगरपंचायतचे नगरसेवक, कर्मचारी, पत्रकार बांधव, जनविकास परिवर्तन आघाडीचे पदाधिकारी,कार्यकर्ते आणि बचत गटाच्या महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पिस्तूलराज रोखण्यासाठी मुख्य सचिवांची समिती

## बीडच्या घटनेपासून धडा घेत कृती आराखडा तयार करणार



मुंबई /प्रतिनिधी

राज्यातील पिस्तूलराज रोखण्यासाठी राज्य शासनाने मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यीय समिती स्थापन केली. तसेच राज्यातील शस्त्रांच्या खरेदी विक्री करणारे परवानाधारक तसेच शस्त्र उत्पादन कारखान्यांचेही लेखापरीक्षण करण्यासाठी कृती आराखडा तयार होणार आहे. त्यामुळे राज्यातील अवैध शस्त्रविक्री आणि बेकायदेशीर वापरावर चाप बसेल असा दावा केला जात आहे.

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर बीडमधील पिस्तूलराज समोर आले. पुण्यात कोयत्या गँगने धुमाकूळ घातला आहे. म्हणून अशा गुंडांविरुद्ध सरकार ॲक्शन मोडवर आले आहे. त्याचाच एक भाग म्हणून मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्याचा निर्णय गृह विभागाने घेतला आहे. या समितीत गृह विभागाचे अपर मुख्य सचिव, पोलिस महासंचालक, विधी व न्याय विभागाचे प्रधान सचिव, मुख्य सचिवाद्वारा नामनिर्देशित बॅलेस्टिक्स क्षेत्रातील एक तज्ज्ञ यांचा समावेश आहे. वर्षातून एकदा समितीची बैठक होणार आहे.

### समिती काय करणार

राज्यातील अवैध शस्त्र व दारूगोळा निर्मिती विक्री वाहतूक यासंबधीची माहिती मिळवणार, अवैध शस्त्र व दारूगोळ्याची तस्करी रोखण्यासाठी उपाययोजना सांगणार. तसेच शस्त्र व दारूगोळा उत्पादन व खरेदी-विक्री परवाना नसलेल्या कारखान्यांची सक्षम प्राधिकाऱ्यांमार्फत तपासणी, लेखापरीक्षण करणार आहे.

### बीडमध्ये सर्वाधिक बेकायदेशीर शस्त्रे

सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी बीड जिल्ह्यातील हवेत गोळीबार करून दहशत निर्माण करणाऱ्या अनेकांचे फोटो एक्स या सोशल मीडियावर ट्वीट केले होते. दरम्यान, गृह विभागाकडून बीड जिल्ह्यातील परवानाधारकांचाही आढावा घेण्यात आला आहे. त्या वेळी बेकायदेशीर शस्त्रांची संख्या अधिक असल्याचे समजते. त्यामुळे बीडमधील शस्त्रांचे लेखापरीक्षण होणार असल्याचे एका अधिकाऱ्याने सांगितले.





# तैमूर-जेहच्या नॅनीसोबत चोराची बाचाबाची

## सैफच्या पाठीत मागून धारदार शस्त्र खुपसलं, प्रतिकार करुन चोराला पळवलं

मुंबई: बॉलीवूड अभिनेता सैफ अली खान याच्यावर वांद्रे येथील राहत्या घरी बुधवारी रात्री एका चोराने हल्ला केला. या चोराने सैफच्या अंगावर धारदार शस्त्राने अनेक वार केले. यामध्ये सैफ अली खानच्या मानेवर, पाठीवर आणि हातावर गंभीर वार झाले. हा सगळा प्रकार रात्री अडीचच्या सुमारास घडला. या घटनेबाबत सैफ अली खानच्या टीमकडून एक निवेदन जारी करुन माहिती देण्यात आली आहे.

या निवेदनातील माहितीनुसार, चोर सैफच्या घरात शिरला. तैमूर आणि जेह या मुलांच्या नॅनीला तो दिसला आणि या दोघांमध्ये बाचाबाची सुरु झाली. हा गोंधळ ऐकून सैफ बेडरुमच्या बाहेर आला. तेव्हा चोराने मागच्या बाजूने त्याच्या पाठीत धारदार शस्त्रं खुपसले. करिना आणि लहान मुलं घरात असल्यामुळे सैफने या चोराला प्राणपणाने प्रतिकार केला. मी चोराला काबूत आणण्याचा प्रयत्न करत होतो. मात्र, त्याने माझ्यावर धारदार शस्त्राने अनेक वार केले. त्यामुळे माझ्या शरीरातून बरेच रक्त वाहायला लागले होते. त्यानंतर घरात आरडाओरडा झाल्याने चोर पळून गेला, असा जबाब सैफ अली खाने पोलिसांना दिल्याची माहिती आहे. या घटनेचा आणि चोराचा तपास मुंबई पोलिसांकडून सुरु आहे.

# सरपंच हत्या प्रकरण:न्यायालय आवारात राडा ; पोलिसांनी केले गुन्हे दाखल

**बीड- सरपंच संतोष देशमुख हत्या व खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराड याला न्यायालयाने सात दिवसाची पोलीस कोठडी दिल्यानंतर वाल्मीक कराड समर्थकांनी न्यायालय आवारात घोषणाबाजी केली. यासोबतच आरोपीला फाशीची शिक्षा द्या अशी घोषणाबाजी करत जमावबंदीचे आदेश तसेच सरकारी कामात अडथळा आणल्या प्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत.**

मकोका गुन्ह्यातील आरोपी वाल्मीक कराड याला आज १५ जानेवारी रोजी बीड जिल्हा न्यायालयातील विशेष मकोका कोर्टात हजर करण्यात आले होते. त्या अनुषंगाने बीड जिल्हा न्यायालय परीसरात मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त लावण्यात आलेला होता. आरोपीस कोर्टात हजर केल्यानंतर पोलीस वाहनांतुन ४.४० ते ५ वा. दरम्यान परत बाहेर घेवून जात असताना बीड कोर्टाचे परीसरात सुनिल श्रीरंग फड वय ५० वर्षे. रा. परळी,ता. परळी,ज्ञानोबा दगडू मुंडे वय ३६ वर्षे, रा. उखळी ता. गंगाखेड, जि. परभणी, जिवन माणीक कराड वय ३० वर्षे रा. पिराचीवाडी ता. केज, जि. बीड व इतर अनोळखी ३० ते ३५ यांनी गैरकायद्याची मंडळी जमवून वाल्मीक कराड यांच्या वरील खोटा गुन्हा मागे घ्यावा अशी घोषणाबाजी करुन जिल्हाधिकाऱ्यांनी लागू केलेल्या जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करुन सरकारी कामात अडथळा निर्माण केला. याप्रकरणी सपोनी विलास श्रीमंतराव मोरे वय ३९ वर्षे, शिवाजीनगर पोलीस स्टेशन, बीड यांच्या फिर्यादीवरुनगु.र.नं. २९/२०२५बी.एन.एस.एस. कलम १३२, २२१. १८९ (२), १८९(३), १९१(२), १९० सह म.पो.का. कलम १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात करण्यात आला.

याबरोबरच न्यायालय परिसरात हेमा श्रीहरी लोमटे (पिंपळे) रा. स्वराज्य नगर,बीड, मनिषा गंगाधर कुपकर रा. अंबीका नगर, बीड, संगीता कोकाटे व इतर १० ते १२ महीला यांनी गैरकायद्याची मंडळी जमवुन जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करुन संतोष देशमुख यांचे मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा झालीच पाहीजे अशी घोषणाबाजी करुन सरकारी कामात अडथळा निर्माण केला.



याप्रकरणी महिला पोलीस उपनिरीक्षक निता गजानन दामधर शिवाजीनगर पोलीस स्टेशन यांचे फिर्यादीवरुन बी.एन.एस.एस. कलम १३२, २२१, १८९ (२), १८९(३), १९१(२), १९० सह म.पो.का. कलम १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. या प्रकरणाचा पोलीस तपास करत आहेत.

पोलीसांकडुन आवाहन सध्या बीड जिल्ह्यात मा.जिल्हाधिकारी साहेब, बीड यांचे जमावबंदी आदेश लागु असुन कोणीही गैरकायदेशीर जमाव जमवुन बेकायदेशीरपणे आंदोलन करुन सार्वजनीक शांतता भंग होईल असे कृत्य करु नये तसेच दोन समाजात तेढ निर्माण होईल अशा प्रकारचे वक्तव्य प्रत्यक्ष अथवा सोशल मिडीयावर करु नये अथवा आक्षेपार्ह मजकुर लिहू नये असे आढळुन आल्यास प्रचलीत कायद्यान्वये संबंधीता विरुध्द गुन्हे दाखल करुन कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

# संतोष देशमुख प्रकरणात न्यायालयीन समितीची स्थापना, राज्य सरकारचं मोठं पाऊल

**बीड/प्रतिनिधी**

**सरपंच हत्या प्रकरणाचा तपास सध्या सीआयडी आणि एसआयटीकडून सुरु आहे. राज्य सरकारने या प्रकरणाच्या तपासासाठी एका समितीची स्थापना केली होती. या समितीमध्ये बदल करावा, अशी मागणी केली जात होती. त्या मागणीनुसार राज्य सरकारने त्या समितीमध्ये बदल करत नव्या समितीची स्थापना केली होती.**

सीआयडी आणि या समितीकडून या प्रकरणाचा सखोल तपास केला जात आहे. विशेष म्हणजे या प्रकरणात तपासासाठी न्यायालयीन समितीचीदेखील मागणी काही जणांकडून केली जात होती. या प्रकरणातील प्रत्यक्ष हत्या करणाऱ्या आरोपींना अटक करण्यात आली आहे. केवळ कृष्णा आंधळे नावाचा आरोपी हा फरार आहे. त्याचादेखील शोध सुरु आहे. तसेच हत्या प्रकरणाचा कट कोणी रचला होता, हत्या का केली? याचा सखोल तपास केला जातोय. या प्रकरणी सीआयडी आणि एसआयटीकडून कोर्टात अनेक दावे करण्यात आले आहेत. त्यानंतर आता याच प्रकरणी राज्य सरकारने मोठं पाऊल उचललं आहे. राज्य सरकारने या प्रकरणाच्या तपासासाठी माजी न्यायाधीश एम. एल. ताहलियानी यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय चौकशी समितीची स्थापना केली आहे. राज्य सरकारकडून याबाबत जीआरदेखील काढण्यात आला आहे.

# शहापूरजवळ ५ वाहनांचा विचित्र अपघात

कसारा (प्रतिनिधी)


मुंबई - नाशिक महामार्गावरील शहापूर गोठेघरजवळ भरधाव कंटेनरने इतर पाच वाहनांना धडक दिल्याने विचित्र अपघात झाला. या अपघातात ३ जणांचा मृत्यू झाला असून १४ जण जखमी झाल्याचे सांगण्यात येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आज पहाटे ३.५० च्या सुमारास भरधाव वेगात असणाऱ्या एका कंटेनरने समोरील तीन वाहनांसह दुसऱ्या मार्गिकेवरील एका बसला धडक दिली. या विचित्र अपघातात ३ बस प्रवाशांचा मृत्यू झाला. तर १४ जण जखमी झाले आहेत. या जखमी झालेल्यांपैकी ८ जणांना ठाणे शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आले असून त्यांची प्रकृती चिंताजनक आहे. तर ६ जण शहापूर येथे उपचार घेत आहेत. मृतांमध्ये १ पुरुष व २ महिलांचा समावेश आहे.

दरम्यान, जखमी प्रवासी हे ट्रक,टेम्पो आणि बसमधील असून अपघाताची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी मिलिंद शिंदे, महामार्ग पोलीस केंद्राच्या छाया कांबळे, शहापूर महामार्ग पोलीस, शहापूर पोलीस,आपत्ती व्यवस्थापन टीमचे सदस्य घटनास्थळी दाखल झाले असून मदतकार्य सुरु आहे. तसेच, या प्रकरणी पुढील कार्यवाही

# जामखेडमध्ये बोलेरो कारचा भीषण अपघात खोल विहिरीत कोसळल्याने पाण्यात बुडून ४ ठार

अहिल्यानगर (प्रतिनिधी)

रस्ते अपघाताचे प्रमाण वाढले असून काही गेल्या कमी होताना दिसून येत नाही. कधी रस्त्यांमुळे, कधी वाहनचालकांच्या चुकीमुळे तर कधी अन्य कारणामुळे रस्ते अपघात होऊन अनेकांना जीव जात असल्याची दु:खद घटना घडत आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेडच्या जामवाडीत चार चाकी वाहन विहिरीत पडून अपघाताची दुर्दैवी घटना घडली. कठडा किंवा पायऱ्या नसलेल्या एका विहिरीत हे वाहन कोसळल्याने चारचाकी वाहनातील ४ जणांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला आहे. या घटनेनं जामवाडी गावावर शोककळा पसरली आहे. आज सायंकाळी साडेचार वाजण्याच्या सुमारास ही दुर्घटना घडली. घटनेची माहित मिळताच स्थानिक ग्रामस्थ व पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यानंतर, पाण्यात बुडलेल्यांना विहिरीतून वर काढण्यात आले. मात्र, दुर्दैवाने चारही जणांचा मृत्यू झाला होता. अशोक विठ्ठल शेळके (वय २९) रामहरी गंगाधर शेळके (वय ३५), किशोर मोहन पवार (वय ३०) आणि चक्रपाणी सुनिल बारस्कर (वय २५) अशी मृत्यूमुखी पडलेल्यांची नावे आहेत. जामवाडीतील या भीषण व हृदद्रावक



अपघाताच्या घटनेने जामखेड तालुक्यात हळहळ व्यक्त होत आहे. जामखेड पोलीस व अग्निशामक दल घटनास्थळी दाखल झाल्यानंतर ग्रामस्थांच्या मदतीने चौघांचे मृतदेह विहिरीच्या बाहेर काढण्यात आले. बोलेरो या चारचाकी वाहनाने रामहरी गंगाधर शेळके, अशोक विठ्ठल शेळके, किशोर मोहन पवार, चक्रपाणी सुनील बारस्कर हे प्रवास करत होते. जामवाडी गावात रस्त्याचे काम चालू असल्याने येथील रस्त्यावर खडी टाकलेली होती. त्यामुळे, वाहनचालकास अंदाज न आल्याने चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि कार थेट रस्त्याकडला असलेल्या विहिरीत पडले. विहीर अतिशय खोल व विहिरीत पाणी असल्याने वाहनातील प्रवाशांना बाहेर पडणे शक्य झाले नाही. त्यामुळे, विहिरीतील पाण्यात बुडून चौघांचाही मृत्यू झाला.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक महेश पाटील आणि सहकारी घटनास्थळी दाखल झाले. त्यानंतर अग्निशमन दलासही पाचारण करण्यात आले. क्रेनच्या मदतीने व ग्रामस्थांच्या सहकाऱ्याने विहिरीत कार व सर्वांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. पाण्यातून बाहेर काढल्यानंतर सर्वांना रुग्णालयात नेण्यात आले होते, पण डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केलं. या घटनेनं गावावर शोककळा पसरली असून जिल्ह्यात हळहळ व्यक्त होत आहे.


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT